# सोलापूर महानगरपालिका

**नगर अभियंता कार्यालय,**

# प्रधानमंत्री आवास योजना

**उक्त योजनेअंतर्गत अर्जदार यांनी स्वत:चे जागेवरील बांधकामास योजना राबविणे संदर्भातील कार्यपद्धती**

**बांधकाम परवनागी करिता मार्गदर्शक तत्वे**

**Step 1)** अर्जदार यांचेकडून विहित नमुन्यातील प्रश्नावली फॉर्म (Questionery Form) भरून घेणेत यावे. अर्जदारांना बांधकाम परवानगी मिळणेबाबत लागणारी कागदपत्रे यांची माहिती देणे. बांधकाम परवानगी करिता येणाऱ्या खर्चाचे अंदाजित एस्टिमेट करण्यात यावे.

**Step 2)** अर्जदारांकडून बांधकाम परवाना कागदपत्राची पूर्तता झाल्यानंतर तांत्रिक सेवा पुरविणाऱ्या इंजिनिअर्स, आर्कीटेक्ट्स, सुपरव्हायझर्स यांची माहिती देणे.

**Step 3)** अर्जदार यांनी इंजिनिअर्स, आर्कीटेक्ट्स, सुपरव्हायझर्स यांची निवड केल्यानंतर, त्या संबंधित इंजिनिअर्स, आर्कीटेक्ट्स, सुपरव्हायझर्स यांचेकडून परस्पर बांधकाम परवानगी नकाशे तयार करणे याच कालावधीमध्ये संबंधित नियुक्त इंजिनिअर्स, आर्कीटेक्ट्स, सुपरव्हायझर्स यांचेमार्फत टॅक्स NOC, रस्ते व ड्रेनेज NOC, वगैर कागदपत्रे तयार करणेत यावे. **(वेळमर्यादा कॅलेंडर ७ दिवस)**

**Step 4)** इंजिनिअर्स, आर्कीटेक्ट्स, सुपरव्हायझर्स यांचेकडून नकाशे तयार झालेनंतर बांधकाम परवाना प्रस्ताव ॲटो डी.सी.आर. (Auto DCR) करून सादर करणे **(वेळमर्यादा कार्यालयीन १ दिवस)**

**Step 5)** इंजिनिअर्स, आर्कीटेक्ट्स, सुपरव्हायझर्स यांचेकडून नकाशे तयार झालेनंतर बांधकाम परवाना प्रस्ताव ॲटो डी.सी.आर. (Auto DCR) तपासणी झालेनंतर बांधकाम परवानगी प्रस्ताव करून इंजिनिअर्स, आर्कीटेक्ट्स, सुपरव्हायझर्स यांचेकडून प्रधानमंत्री आवास योजना कार्यालयास सादर करणे. प्रधानमंत्री आवास योजना कार्यालयाकडून सर्व कागदपत्रांसह प्राप्त झालेले प्रस्तावाबाबत सहा. संचालक नगर रचना कार्यालयाने अभिप्रायास्तव पाठविणे **(वेळमर्यादा कार्यालयीन १ दिवस)**

**Step 6)** प्रधानमंत्री आवास योजना कार्यालयाकडून सर्व कागदपत्रांसह प्राप्त झालेले बांधकाम परवानगी प्रस्ताव संदर्भात सहा. संचालक नगर रचना कार्यालयाने अभिप्राया देणे. **(वेळमर्यादा कार्यालयीन ४ दिवस)**

**Step 7)** सहा. संचालक नगर रचना कार्यालयाने देण्यात आलेल्या बांधकाम परवानगी प्रस्तावाची छाननी बांधकाम परवानगी विभागाकडून करणे.

अ) बांधकाम परवानगी प्रस्ताव मंजूरीनंतर विकासशुल्क (DF) रक्कम भरून घेणे.

ब) तांत्रिक बाबीची त्रुटी आढळयास पूर्तता करणे करीता अर्जदारांना कळविणे.

**(वेळमर्यादा कार्यालयीन ४ दिवस)**

**Step 8)** विकासशुल्क (DF) रक्कम स्विकारून त्यानंतर ॲटो डी.सी.आर. (Auto DCR) कडून बांधकाम परवाना नकाशे व हुकुमनामा प्राप्त करणे. **(वेळमर्यादा कार्यालयीन १ दिवस)**

**Step 9)** बांधकाम परवाना नकाशे व हुकुमनामा यांस मंजुरी देणे. **(वेळमर्यादा कार्यालयीन ३ दिवस)**

## एकुण वेळमर्यादा २१ दिवस